**"मागेल त्याला शेततळे" योजना मंजूर करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक — १७ फेब्रुवारी, २०१६.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात पावसाचे प्रमाण कमी तसेच अनिश्चित झाले आहे. त्यामुळे कोरडवाहू क्षेत्रातील पुर्णत: पावसावर अवलंबून असलेल्या पिकांवर तसेच त्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी व मा. मंत्री जलसंधारण व रोहयो यांनी दुष्काळी जिल्हयांचा दौरा केला असता पावसात पडलेला खंड व पाण्याची टंचाई व पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी शेततळे उपलब्ध करून देण्याची मागणी शेतक-यांनी केलेली आहे. शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी शेततळे उपयुक्त असल्याने राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविणे तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांनी उपरोक्त परिस्थितीचा सारासार विचार करुन हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे **" मागेल त्याला शेततळे "** ही योजना जाहीर केली. सदरचा कार्यक्रम हा शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून हा कार्यक्रम flagship programme म्हणून अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

यापूर्वी सन २००९-१० ते सन २०११-१२ या कालावधीत राष्ट्रीय कृषि विकास योजना व रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुक्रमे ७३,३२८ व १६,६८२ अशी एकुण ९०,०१० शेततळयांची कामे अनुदान पध्दतीने पुर्ण झाली आहेत.या शेततळ्यांमुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामात पावसाच्या खंडीत कालावधीत फायदा झाला असून उत्पादनात काही प्रमाणात शाश्वतता आली आहे.या शेततळयाच्या झालेल्या कामाचे मुल्यमापन ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन (ए.एफ.सी.),मुंबई या त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आले असून संस्थेच्या अभिप्रायात **"शेततळे निर्माण केल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होवून**

**शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. शेततळे ही योजना शेतकऱ्यास संजीवनी देणारी योजना ठरली आहे."** असे सकारात्मक नमुद केले आहे.

सन २०१५-१६ या वर्षात राज्यात सरासरीचे तुलनेत ६० टक्के पर्जन्यमान असून राज्यामध्ये ७ जिल्ह्यामध्ये २५ ते ५० टक्के पर्जन्यमान झाले असून १९ जिल्ह्यामध्ये ५० ते ७५ टक्के पर्जन्यमान झाले आहे. फक्त ८ जिल्ह्यात ७५ ते १०० टक्के पर्जन्यमान आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात **"मागेल त्याला शेततळे"** योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ५०,००० शेततळी घ्यावी लागतील. राज्य रोहयो अंतर्गत शेततळे कार्यक्रमासाठी सन २०१५-१६ या वर्षात रु.१०००/- फक्त इतकी लाक्षणिक (Token) तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. सबब या योजनेसाठी रोहयो अंतर्गत सद्य:स्थितीत निधी उपलब्ध नाही. शेततळे योजनेसंदर्भात दि.७/१२/२०१५ रोजी नागपूर येथे मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत असे निर्देश देण्यात आले की, शेततळे योजने साठी आवश्यक निधी "योजनेतर- Drought Mitigation Measures" अंतर्गत, मदत व पुर्नवसन विभागाकडून या विभागास उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात यावी. सद्य:स्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता शेतकऱ्यांकडे स्वत:ची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेततळी घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यात **" मागेल त्याला शेततळे "** योजनेची अनुदान पध्दतीने अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेबाबत प्रथम टप्प्यातील जिल्हानिहाय मंजूर लक्षांक सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सदर शेततळे कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे अटी व शर्ती लागू रहातील.**

**१.१ लाभार्थी पात्रता :-**

१) शेतकऱ्यांकडे त्याच्या नावावर कमीतकमी ०.६० हेक्टर जमीन असावी. यात कमाल मर्यादा नाही.

२) लाभार्थी शेतकऱ्याची जमीन शेततळयाकरिता तांत्रिक दृष्टया पात्र असणे आवश्यक राहील. जेणेकरुन पावसाचे वाहणारे पाणी शेततळयामध्ये भरणे अथवा पुनर्भरण करणे शक्य होईल.

३) यापुर्वी अर्जदारांनी शेततळे, सामुदायिक शेततळे अथवा भात खाचरा सोबत तयार होणारी बोडी या घटकांचा शासकीय योजनांमधून लाभ घेतलेला नसावा.

**१.२. लाभार्थी निवड खालील प्राथमिकतेनुसार करावी.**

१) दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) शेतकरी व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेली आहे, त्यांच्या वारसांना निवड प्रक्रीयेमध्ये जेष्ठता यादीत सूट देऊन प्रथम प्राधान्याने त्यांची निवड करण्यात यावी.

२) वरील (१) व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्गातील शेततळे मागणी करणा-या शेतक-यांची जेष्ठता यादीनुसार ( प्रथम अर्ज सादर करणा-यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे) सदर योजने अंतर्गत निवड करण्यात यावी.

**टिप :- या योजने अंतर्गतचा निधी Drought Mitigation Measures म्हणून मदत व पुनर्वसन विभागा मार्फत उपलब्ध होणार असल्याने मागील ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमधील लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असणाऱ्या गावांची यादी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करावी.**

**१.३. शेततळयासाठी अनुज्ञेय आकारमान व अनुदान:-**

या योजनेअंतर्गत खालील आकारमानापैकी एका प्रकारचे शेततळे घेण्यास मुभा राहील.

आकारमान निहाय शेततळयाचे पृष्ठभागा वरील क्षेत्रफळ आणि अपेक्षित खोदकाम खालील प्रमाणे राहील.

इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे —

| अ.क्र. | शेततळयाचे आकारमान | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) |
|---|---|---|---|
| **अ. इनलेट आऊटलेटसह शेततळे** | | | |
| १. | १५x१५x३ मीटर | २२५ | ४४१ |
| २ | २०x१५x३ मीटर | ३०० | ६२१ |
| ३ | २०x२०x३ मीटर | ४०० | ८७६ |
| ४ | २५x२०x३ मीटर | ५०० | ११३१ |
| ५ | २५x२५x३ मीटर | ६२५ | १४६१ |
| ६ | ३०x२५x३ मीटर | ७५० | १७९१ |
| ७ | ३०x३०x३ मीटर | ९०० | २१९६ |
| **ब. इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे** | | | |
| १ | २०x१५x३ मीटर | ३०० | ६२१ |
| २ | २०x२०x३ मीटर | ४०० | ८७६ |
| ३ | २५x२०x३ मीटर | ५०० | ११३१ |
| ४ | २५x२५x३ मीटर | ६२५ | १४६१ |
| ५ | ३०x२५x३ मीटर | ७५० | १७९१ |
| ६ | ३०x३०x३ मीटर | ९०० | २१९६ |

या योजने अंतर्गत वरीलप्रमाणे विविध आकारमानाच्या शेततळ्यांपैकी कोणत्याही एका आकारमानाच्या शेततळ्याची मागणी करता येईल. यामध्ये जास्तीत जास्त ३०x३०x३ मीटर या आकारमानाचे व कमीत कमी इनलेट आऊटलेटसह प्रकारामध्ये किमान १५x१५x३ मीटर या आकारमानाचे शेततळे घेता येईल. तसेच इनलेट आऊटलेट विरहीत प्रकारामध्ये किमान २०x१५x३ मीटर या आकारमानाचे शेततळे घेता येईल. इनलेट आऊटलेट विरहीत प्रकारामध्ये पाणी भरण्याची कार्यवाही पावसाळयात अतिरिक्त वाहून जाणाऱ्या पाण्यातून प्राधान्याने करावी.

**शेततळ्यांच्या उपरोक्त नमुद आकारमानांनुसार देय होणारी अनुदानाची रक्कम आयुक्त, कृषि यांनी शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर त्वरित निश्चित करावी व त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना त्वरीत निर्गमित कराव्यात. तथापि देय अनुदानाची कमाल रक्कम रुपये ५०,०००/- इतकी राहील. रु.५०,००० पेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरीत रक्कम संबंधीत लाभार्थीने स्वत: खर्च करणे अनिवार्य राहील.**

त्याचप्रमाणे जास्तीत जास्त पाच शेतक-यांचा गट करून त्यांना एकत्रितरित्या सामुदायिक शेततळे घेता येईल. या शेततळ्याचे आकारमान अनुज्ञेय आकारमानाच्या प्रमाणात राहील. एकत्रित खोदकामाची घनमीटरची अट पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच त्यांना मिळणारे अनुदान व पाण्याचा वापर, पाण्याची हिस्सेवार याबाबत संबंधित शेतक-यांनी १०० रूपयाच्या स्टॅपपेपरवर करार करावा व तो अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

**१.४ जिल्हानिहाय लक्षांक :-**

या योजने अंतर्गत राज्यात सन २०१६-१७ या वर्षात पहिल्या टप्प्यात एकूण ५१,५०० शेततळी पुर्ण करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले असून जिल्हानिहाय लक्षांक सोबतच्या **परिशिष्ट- अ** मध्ये स्वतंत्ररित्या देण्यात आलेला आहे.

या योजने अंतर्गतचा निधी Drought Mitigation Measures म्हणून मदत व पुनर्वसन विभागामार्फत उपलबध होणार असल्याने मागील ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमधील लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असणाऱ्या गावांची यादी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करावी. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने तालुक्यातील प्रथम टप्प्यातील शेततळ्यांचा लक्षांक निश्चित करावा.

**२. शेततळे योजनेची अंमलबजावणी :-**

**२.१ योजनेचा प्रसार व प्रसिध्दी :-**

"मागेल त्याला शेततळे" योजने अंतर्गत शेततळ्याच्या कार्यक्रमास क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सर्वदूर प्रसिध्दी द्यावी. कृषि विभागाची सर्व कार्यालये तसेच जिल्हाधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिध्दी देण्यात यावी. कृषि विभागाच्या यंत्रणेमार्फत वैयक्तिक व सामुहिक बैठका, मेळावे घेण्यात यावे. या व्यतिरीक्त योजनेच्या प्रसारासाठी जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक असून, सदर जाहिरात जिल्हा माहिती अधिका-यामार्फत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाप्रामणे आवश्यक त्या तीन मोठया प्रमाणावर खप असलेल्या स्थानिक वर्तमानपत्रामधून देण्यात यावी. जाहिरात वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द करावी. अशा विविध स्तरावरुन प्रचार करावा. इच्छुक लाभार्थींना ठराविक मुदतीत अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात यावे.

त्याचप्रमाणे या कार्यक्रमातंर्गत घेण्यात आलेल्या शेततळ्यांमुळे सिंचनासाठी व पूरक कृषि उद्योगासाठी ( उदा. पशुसंवर्धन, मत्स्योत्पादन इ.) वापर, शेततळे कार्यक्रमाचे विविध विस्तार योजनांशी सांगड घालून, संरक्षित सिंचनामुळे पिकाचे उत्पादन वाढ, शेतकऱ्याचे राहणी मानातील बदल, शेततळ्याचा

परिणाम इ. बाबीस क्षेत्रीय स्तरावरुन प्रसिध्दी देण्यांत यावी. याबाबत यशोगाथाही तयार कराव्यात. स्थानिक स्तरावर वर्तमानपत्रे, कृषि मासिके याबरोबरच आकाशवाणी, दूरदर्शन इ. माध्यमातूनही प्रसिध्दी द्यावी. शासन सूचनानुसार संबंधित जिल्हाधिकारी व शासनाकडे ई-मेलद्वारे यशोगाथा सादर कराव्यात. राज्यस्तरावरून देखील व्यापक प्रचार प्रसिध्दीकरिता दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे, भित्तीपत्रके इ. दृकश्राव्यमाध्यमांद्वारे प्रचार प्रसिध्दी रोहयो विभागामार्फत करण्यात यावी.

या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी कृषि विभागाचे क्षेत्रिय स्तरावरील कर्मचारी यांचे तालुका पातळीवर एक दिवसाचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. तसेच जिल्हा पातळीवर योजना अंमलबजावणीशी संबंधित सर्व विभागाचे अधिकारी यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण सत्र जिल्हाधिकारी यांनी आयोजित करावे.

**२.२ लाभार्थ्यांकडून अर्ज मागविणे:-(अर्जाची उपलब्धता व ऑनलाईन नोंदणी)**

इच्छुक शेतक-यांचे विहित नमुन्यातील अर्ज तथा संमती या योजनेत भाग घेण्यासाठी अनिवार्य आहे. याबाबत शेतक-यांनी त्यांची मागणी ऑनलाईनद्वारे संगणकीय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. यासाठी करावयाचे अर्ज https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

या वेबसाईटवरून अर्जाचा नमुना (प्रपत्र – २) इच्छुक लाभार्थ्यांनी दिनांक २३/२/२०१६ पासून अर्ज download करून घ्यावेत. प्रपत्र २ मध्ये नमूद केलेली माहिती जमा करून मूळ अर्ज भरून लाभार्थ्यांने स्वत:च्या स्वाक्षरीसह सर्व कागदपत्रे Scan करून ठेवावे. Online पध्दतीद्वारे या https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्जातील माहिती Online भरुन अर्जात नमूद केलेली जोडपत्रे Scan Copy जोडुन Upload करावी. Online अर्जाची पोचपावती इच्छुक लाभार्थ्यांनी download करून स्वत:कडे ठेवावी.

Online अर्ज Upload करण्याची प्रक्रिया दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वर नमूद केलेल्या वेबसाईटवर उपलब्ध राहिल.

या योजनेत अर्ज करणा-या व्यक्तीने "आपले सरकार" संकेतस्थळावर जाऊन मागेल त्याला शेततळे या लिंक वर क्लिक करावे. त्यानंतर अर्जदारास खालील तीन पर्याय उपलब्ध राहतील.

अ) आपले सरकार संकेत स्थळावर यापूर्वीच तयार केलेल्या प्रोफाईल चा वापर करणे.

ब) आपले सरकार पोर्टल वर नव्याने प्रोफाईल तयार करुन. (वरील अ नुसार प्रोफाईल उपलब्ध नसल्यास)

क) कोणत्याही महा ई सेवा केंद्रामार्फत (CSC मध्ये)

प्रथम उपरोक्त (अ) व (ब) मधील पर्यायांकरीता स्वत:चा मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच (अ) व (ब) बाबत अर्जदार स्वत: अथवा सायबर कॅफेतून संगणकाचा वापर करुन अर्ज भरु शकतो. अर्जासाठी सेवाशुल्क रु.२० अधिक सेवाकर लागू राहील.

उपरोक्त (क) बाबत अर्जदाराकडे मोबाईल क्रमांक नसल्यास महा ई सेवा केंद्रातून अर्ज भरत असताना वरील बाबींसाठी (Scanning, Uploading इत्यादी) प्रक्रिया महा ई सेवा केंद्र चालकाचे मार्फत कराव्यात.

**२.३ शेततळयांच्या जागा निवडीचे तांत्रिक निकष :-**

शेततळे ही योजना कृषि विभागामार्फत पाणलोटाचा उपचार म्हणून पूर्वीपासूनच राबविण्यांत येत आहे. जागेच्या निवडीबाबत निकष सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहतील :-

१) ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमीन असलेल्या जागेची निवड करावी. काळी जमीन ज्यात चिकनमातीचे प्रमाण जास्त आहे अशा जमिनी शेततळयास योग्य असल्याने अशा जमिनीची निवड करण्यात यावी.

२) मुरमाड, वालूकामय, सच्छिद्र खडक अशी जमीन असलेली जागा शेततळयास निवडू नये.

३) क्षेत्र उपचाराची कामे झालेल्या पाणलोट क्षेत्रात शेततळी प्राधान्याने घेण्यात यावीत.

४) टंचाईग्रस्त गावातील लाभक्षेत्रात शेततळी घेण्यात यावीत. त्यासाठी जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय क्र. सीडीए-१०१५/२६६/१५/लाक्षेवी (कामे) दिनांक १२ मार्च, २०१५ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

५) ज्या ठिकाणी जमिनीचा उतार सर्वसाधारण तीन टक्क्याच्या आत आहे, त्या ठिकाणी शेततळी घेण्यात यावीत.

६) नाल्याच्या / ओहोळाच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येऊ नये.

७) इनलेट / आऊटलेट सहीत शेततळयासाठी पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी हे शेततळयाच्या पाणीसाठा क्षमतेपेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

८) सभोवतालच्या जमिनीत दलदल व चिबड होईल तसेच शेततळे व त्यातून पाणी पाझरुन लगतच्या शेतकऱ्यांच्या स्थावर/जंगम मालमत्तेचे नुकसान होईल अशा जमिनी शेततळयासाठी निवडण्यात येऊ नयेत.

९) शेततळयाला लागणारी जागा शेतकऱ्यांनी स्वखुषीने व विनामुल्य द्यावयाची आहे.

**३. योजनेची अंमलबजावणी, आढावा व संनियंत्रण -:**

**३.१ सदर योजना जिल्हास्तरावर प्रभावीपणे राबविण्यासाठी योजनेचा आढावा व समन्वयासाठी जिल्हास्तरावर मा. पालक मंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

**समिती:-**

| | |
|---|---|
| संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| जिल्ह्यातील खासदार | सदस्य |
| जिल्ह्यातील आमदार | सदस्य |
| जिल्हाधिकारी | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारीजिल्हापरिषद , | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**विभागाचे स्तरावर सदर योजनेचा आढावा व संनियंत्रण या साठी विभागस्तरिय समिती गठीत करण्यात येत आहे.**

**३.२ विभागस्तरिय समिती :-**

| | |
|---|---|
| विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| अधिक्षक अभियंता (सिंचन) ,लघुसिंचन | सदस्य |
| उपायुक्त (रोहयो) | सदस्य |
| उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| सहसंचालक, (कृषि) विभागीय मुख्यालयाव्यतिरिक्त | सदस्य |
| सहसंचालक (कृषी), विभागीय मुख्यालय | सदस्य सचिव |

## ३.३ जिल्हास्तरीय समिती :-

योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण, तालुका निहाय लक्षांक व अनुदान अदायगी, व आढावा यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह अध्यक्ष |
| कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (जि.प.) | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुसिंचन जलसंधारण | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, जलसंपदा | सदस्य |
| वरिष्ठ भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| उपसंचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

## ३.४ तालुकास्तरीय समिती :-

लाभार्थ्यांचे अर्ज दाखल करुन घेणे, अर्जांची छाननी करणे, पात्रतेनुसार निवड करणे, यादीस मान्यता देणे, योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण, अनुदान अदायगी व आढावा यासाठी तालुकास्तरावर तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| उपविभागीय अधिकारी (महसूल) तथा प्रांत | अध्यक्ष |
| उपविभागीय कृषि अधिकारी | सह अध्यक्ष |
| तहसिलदार | सदस्य |
| गटविकास अधिकारी | सदस्य |
| उप अभियंता, लघूसिंचन (जि.प.) | सदस्य |
| उप अभियंता, लघूसिंचन जलसंधारण | सदस्य |
| उप अभियंता, जलसंपदा | सदस्य |
| भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा प्रतिनिधी | सदस्य |
| सामाजिक वनीकरण प्रतिनिधी | सदस्य |
| तालुका कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**४. शेततळ्याचे काम करण्यासाठी अनुसरावयाची पध्दती :-**

४.१

१) या योजनेसाठी लाभार्थी स्वत: वेबसाईट वरुन अर्ज Download करुन घेऊन विहीत मुदतीत आवश्यक त्या प्रमाणपत्रासह Upload करणार आहेत. सदर कार्यवाही करताना लाभार्थ्यांना काही अडचणी उदभवल्यास त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषी अधिकारी व एक लिपीक वर्गीय कर्मचा-याची नियुक्ती करण्यात यावी. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत.

२) जिल्हाधिकारी यांनी याबाबत सर्व तालुक्यात अर्ज प्राप्त करुन घेण्याची कार्यपध्दती सुरु होण्यासाठी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत. तसेच सदर योजनेअंतर्गत निर्गमित आदेशानुसार कार्यपध्दती अंमलबजावणीची तसेच शासन निर्णयात नमुद कालमर्यादे प्रमाणे कार्यवाही होत असल्याची खात्री करावी.

विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांचा आढावा घ्यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (रोहयो) यांना सादर करावा.

३) तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या इच्छूक लाभार्थींचे अर्जाची छाननी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाने वेबसाईटच्या (सॉफ्टवेअरच्या) मदतीने करावी.

४) तालुका कृषि कार्यालयाने प्राप्त परीपूर्ण अर्जाची छाननी करुन अर्ज प्राप्त जेष्ठतेनुसार, पात्र लाभार्थीची यादी तयार करावी. दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) शेतकरी व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेली आहे अशा शेतक-यांच्या वारसांना निवड प्रक्रीयेमध्ये जेष्ठता यादीत सुट देऊन प्रथम प्राधान्याने त्यांची निवड करण्यात यावी.

५) छाननी आधारे तयार होणारी लाभार्थ्यांची यादी तालुका कृषि कार्यालयाने तालुकास्तरीय समितीसमोर सादर करावी.

६) तालुकास्तरीय समितीने दिलेल्या लक्षांकास अनुसरुन पात्र लाभार्थीची निवड करुन मान्यता द्यावी. संबंधित लाभार्थास त्याची या योजनेत निवड झाल्याचे तालुका कृषि अधिका-यामार्फत कळविण्यात यावे. तसेच निवड केलेले/ प्रतिक्षाधीन व अपात्र

अर्जदारांची यादी नोटीस बोर्डवर लावण्यात यावी त्याचप्रमाणे वेबसाईटवर देखील प्रसिध्द करावी.

७) तालुका स्तरीय समितीने निवड केलेल्या लाभार्थीची यादी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत जिल्हा निवड समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावी.

८) तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त कृषि सहायक/कृषि सेवक व कृषि पर्यवेक्षक यांचे मार्फत त्या गावातील मंजूर लाभार्थीचे शेततळयाचे अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे व त्यास तांत्रिक मंजूरीसाठी सादर करावे.

९) तालुकास्तरीय समितीने मंजूरी दिलेल्या यादीतील लाभार्थ्यांचे शेततळ्यांना उप विभागीय कृषि अधिकारी हे तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देतील.

१०) प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यांनतर तालुका कृषि अधिकारी यांनी तात्काळ कार्यारंभ आदेश दयावेत.

११) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थीस लाभ नको असेल किंवा अन्य कारणाने त्याचे नाव वगळावे लागल्यास शिल्लक लक्षांकाच्या प्रतिक्षा यादीतील पुढील पात्र लाभार्थ्यांची निवड तालुकास्तरीय समितीने करावी.

१२) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी ३० दिवसात काम सुरु करावे व तसे तालुका कृषि अधिकारी कार्यालयास लेखी कळवावे, अन्यथा निवड रद्द झाली आहे असे समजण्यात येईल.

१३) अपवादात्मक परिस्थितीमध्ये ३० दिवसापेक्षा जास्त मुदतवाढ द्यावयाची झाल्यास तालुकास्तरीय समितीने शेत परीस्थितीची खातरजमा करून आवश्यक असल्यास आणखी ३० दिवसाची मुदतवाढ द्यावी.

१४) शेततळी बांधण्याचा कार्यक्रम लाभार्थ्याने स्वत: / मजुराद्वारे / अन्य पर्यायी साधनांच्या (जेसीबी, पोकलेन सारखे मशिन्स) सहाय्याने पूर्ण करावयाचा आहे. मात्र याकरीता मशीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची स्वत:ची राहील.

१५) सदर योजने अंतर्गत शेततळे खोदकामासाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांचे कडील कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित कृषि सहायक / कृषि सेवक/ कृषि पर्यवेक्षक/ कृषि अधिकारी यांचेकडून शेतामध्ये मंजूर गट नंबर, सर्व्हे नंबर मध्ये तांत्रिक दृष्ट्या जागा निवड करण्यात आलेल्या ठिकाणी मंजूर आकारमानाप्रमाणे शेततळे आखणी करुन घेण्यात यावी.

अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांने शेततळ्याचे खोदकाम करुन घ्यावे. खोदकामातून निघालेल्या मातीचा भरावा शेततळ्याचे पृष्ठभागाचे शेजारी कृषि सहायक/कृषि सेवक/ कृषि पर्यवेक्षक/ कृषि अधिकारी यांनी आखून दिलेल्या जागेवर बांध स्वरुपात टाकावा. खोदकाम करताना अडचणी आल्यास संबंधित कृषि सहायक / कृषि सेवकाचे मार्गदर्शन घ्यावे.

१६) शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर लाभार्थ्यांने संबंधित तालुका कृषि अधिकाऱ्याला लेखी कळविणे बंधनकारक राहील. तसेच त्यासोबत लाभार्थीने राष्ट्रीयकृत बँक/ इतर बँक खात्याचे पासबूकाचे पहिल्या पानाचे झेरॉक्स जोडावी. (ज्या पानावर बँक खाते क्रमांक नमूद आहे)

१७) लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे लेखी कळविल्यानंतर कृषि सहायक / कृषि सेवक व कृषि पर्यवेक्षक यांनी कामाची प्रत्यक्ष मोजमापे घेऊन मापदंडानुसार अनुज्ञेय अनुदानाची रक्कम अदायगी साठी शिफारस करावी. तालुका कृषि अधिकारी यांनी या योजनेअंतर्गत उपलब्ध निधीतून अथवा निधी प्राप्त झाल्यावर ३० दिवसाच्या आत संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रक्कम थेट जमा करावी. असे करताना जनधन योजनेचे खाते व आधार सिडींग झालेले खाते असल्यास त्यामध्ये अनुज्ञेय रक्कम जमा करावी. तालुका स्तरावर निधी उपलब्ध नसल्यास निधीची मागणी करावी.

१८) शेततळ्याचे काम पुर्ण झाल्यानंतर देय रक्कम अदायगीसाठी शिफारस करणेपूर्वी लाभार्थासह शेततळ्याचा फोटो GPS Image द्वारे वेबसाईटवर अपलोड करणे अनिवार्य राहील.तसेच शेततळ्याचे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश व रेखांश याची

नोंद, मापन पुस्तकात मापे नोंदणी बरोबर घेण्यात यावी. GPS Image सह फोटो upload केल्याशिवाय रक्कम अदायगीस शिफारस करू नये.

**४.२ सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा घेण्याचे जिल्हाधिकारी यांना अधिकार**

सदर योजनेची अंमलबजावणी कृषि विभागामार्फत करण्यात यावी. कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उप विभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व विभागीय कृषी सह संचालक यांनी स्वत: प्रत्येक तालुक्यातील शेततळ्यांची तपासणी कृषी खात्याच्या विहित मापदंडाप्रमाणे करावी. तपासणी अर्ज तपासणीच्या तारखेसह जतन करावेत.

योजना अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार कृषि विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीवर घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत. अशा अधिकारी / कर्मचा-यांचे मानधन तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रिय भेटी करिता शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील. सदरचा खर्च हा या योजने अंतर्गत जिल्ह्यासाठी खर्च होणा-या निधीच्या २ टक्के आस्थापना खर्च या अंतर्गत करण्यात यावा.

**५. योजनेच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक :-**

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात प्रसिध्द करणे - | शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर ७ दिवसात. |
| २) | लाभार्थ्यांनी वेबसाईट वरुन अर्ज प्राप्त करुन घेणे, अर्जासोबत जोडावयाची प्रमाणपत्रे प्राप्त करून घेणे व पुर्ण भरलेले अर्ज आवश्यक प्रमाणपत्रासह Scan करुन Upload करण्याची अंतीम मुदत | जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ४५ दिवस. |
| ३) | प्राप्त अर्जानुसार जागा पाहणी शेततळ्यासाठी जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची तपासणी व दाखला देणे. | कालावधी १० दिवस<br>दर १५ दिवसांनी प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी द्यावेत |
| ४) | प्राप्त अर्जाची छाननी / तपासणी नंतर पात्र अर्जदाराची यादी तयार करणे व पात्र अर्जदाराची यादीस तालुकास्तरीय समितीने मान्यता देणे. | कालावधी १५ दिवस<br>दर १५ दिवसांनी प्राप्त अर्ज तपासून लक्षांकास अनुसरुन तालुकास्तरीय समितीने मंजूर करावेत. |
| ५) | तालुका स्तरीय निवड समितीच्या मंजुरीनंतर शेततळ्यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, प्रतिक्षा यादी क्रमांक, अथवा अपात्र असल्याबाबत लेखी पत्र पाठविणे व यादी प्रसिद्ध करणे. कार्यारंभ आदेश देणे. | |

**टिप :-** मुद्दा क्रमांक ३ मध्ये प्राप्त अर्जाची छाननी / तपासणी व पात्र अर्जदाराची यादी तयार करणे व पात्र अर्जदाराची यादीस तालुकास्तरीय समितीने मान्यता देणे यासाठी एकूण मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ४५ दिवस आहे. तथापि १५ दिवसाच्या अंतराने प्राप्त अर्ज तपासून लक्षांकास अनुसरुन तालुकास्तरीय समितीने मंजूर करावेत.

**६. तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मंजूरी :-**

**अ)** शेततळयाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास तांत्रिक मंजूरी / प्रशासकीय मंजूरी उपविभागीय कृषि आधिकारी यांनी १० दिवसात दयावी.

**ब)** तालुका कृषि अधिकारी यांनी तात्काळ कार्यारंभ आदेश द्यावेत.

**७. लाभार्थ्यांची जबाबदारी :-**

१) कृषि विभागाचे कृषि सहायक / कृषि सेवक यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.

२) कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३) लाभार्थीने स्वत:चा राष्ट्रीयकृत बँक / इतर बँके मधील खाते क्रमांक संबंधित कृषि सहायक / कृषि सेवक यांचेकडे पासबुकाच्या झेरॉक्ससह सादर करावा.

४) कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.

५) शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी.

६) शेततळ्याची निगा व दुरूस्तीची जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील.

७) पावसाळयामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था लाभार्थ्याने स्वत: करावी.

८) लाभार्थ्यांच्या ७/१२ चे उता-यावर शेततळ्याची नोंद घेणे बंधनकारक राहील.

९) शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे योजनेचा बोर्ड लाभार्थ्यांने स्वखर्चाने लावणे बंधनकारक आहे.

१०) नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

११) मंजूर आकारमानाचे शेततळे खोदणे हे लाभार्थीस बंधनकारक राहील.

१२) इनलेट आऊटलेट विरहित शेततळी घेणाऱ्या लाभार्थीकडे शेततळयामध्ये पाणी उचलून टाकण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच अशा शेततळयासाठी शेतकऱ्यांनी प्लॅस्टीक अस्तरीकरण स्वखर्चाने करावे.

**८. कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबदारी :-**

१. जागेची निवड कृषि सहायक/कृषि सेवक/कृषि पर्यवेक्षक/कृषि अधिकारी यांनी तांत्रिक निकषाप्रमाणे करावी व तसे प्रमाणपत्र संबंधित लाभार्थ्यास देण्यात यावे.

२. मंजूर आकारमानाप्रमाणे शेततळ्याची आखणी करुन देणे.

३. खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.

४. लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे लेखी कळविल्यानंतर कृषि सहायक / कृषि सेवक व कृषि पर्यवेक्षक यांनी कामाची प्रत्यक्ष मोजमापे घ्यावी. तसेच देय रक्कम अदायगीसाठी शिफारस करणेपूर्वी लाभार्थ्यांसह शेततळ्याचा फोटो GPS Image द्वारे वेबसाईटवर अपलोड करणे अनिवार्य राहील.

तसेच शेततळ्याचे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश व रेखांश याची नोंद मापन पुस्तकात मापे नोंदणी बरोबर घेण्यात यावीत. शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर व लाभार्थीने क्षेत्रिय कर्मचाऱ्याच्या शिफारशीसह तालुका कार्यालयास लेखी कळविल्यानंतर देय रक्कम निधी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात यावी.

५. लाभार्थ्यांकडून त्याचा राष्ट्रीयकृत व इतर बँकेतील खाते क्रमांक पासबुकाच्या झेरॉक्ससह प्राप्त करुन घ्यावा. जनधन योजनेचे खाते व आधार सिडींग झालेले खाते असल्यास त्यामध्ये देय रक्कम प्राधान्याने जमा करावी.

६. तालुकास्तरीय समितीचे मंजूरीनंतर शेत परिस्थितीनुसार अथवा स्थानिक अडचणीमुळे आकारमानात बदल अथवा शेततळयाची लांबी, रुंदी कमी जास्त करण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे बदल करण्यास मुभा राहिल. तथापि अशी मंजूरी खालील अटीस अधिन राहून देता येईल.

अ) उपरोक्त मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाच्या शेततळयाचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास मुळ मंजूर आकारमानाचे शेततळयासाठी देय अनुदानाप्रमाणे अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतकऱ्यांने स्वत: करावयाचा आहे.

ब) उपरोक्त मंजूर आकारमानापेक्षा कमी आकारमानाचे शेततळयाचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास मुळ मंजूर आकाराचे शेततळयासाठी देय असलेले अनुदान ऐवजी त्याचे खालील टप्प्यावरील कमी आकारमानाचे शेततळयासाठीचे देय अनुदानाप्रमाणे अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतकऱ्याने स्वत: करावयाचा आहे.

वरील (अ) व (ब) मध्ये नमूद अटी या लाभार्थ्यास मान्य असल्याबाबत लाभार्थीची लेखी संमती घेऊन आकारमान बदलास संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी मान्यता दयावी.

७. मंजूर आकारमानापेक्षा शेतपरिस्थिती व भूस्तरानुसार खोदकामास मर्यादा आल्यास अशा प्रकरणी तालुका कृषि अधिकारी यांनी स्वत: तपासणी करुन कमी आकारमानाचे काम अंतिम करता येईल. तथापि झालेले काम हे इनलेट आऊटलेट सह शेततळयामध्ये किमान या शासन निर्णयातील नमूद शेवटच्या आकारमानाच्या म्हणजे ४४१ घन मिटर इतक्या आकारमानाचे व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळयामध्ये किमान ६२१ घनमीटर इतक्या आकारमानाचे पाणीसाठा होऊ शकणारे असणे आवश्यक आहे व अशा प्रकरणी त्याचे खालील टप्प्यावरील देय अनुदान मापदंडाप्रमाणे देय राहील.

८. कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण झाल्यावरच अनुदानाची देय रक्कम बँक खात्यात जमा करावी.

## ९. **<u>संनियंत्रण व नोडल अधिकारी :-</u>**

"मागेल त्याला शेततळे" या अंतर्गत जाहीर केलेला शेततळे बांधण्याचा कार्यक्रम कालबध्दरीत्या पूर्ण करण्याची जबाबदारी **आयुक्त (कृषि)**, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. ही योजना राबविण्याकरीता आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **"संनियंत्रण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सर्व समावेशक मार्गदर्शक सुचना या शासन निर्णया सोबतच्या प्रपत्रासह सर्व क्षेत्रिय कार्यालय यांना त्यांच्या स्तरावरून तातडीने निर्गमित कराव्यात. आयुक्त (कृषि) यांचे स्तरावर सनियंत्रणाकरिता व आस्थापना खर्चाकरिता १ टक्के रक्कम राखून ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी आयुक्त कृषि यांचे मान्यतेने संचालक (मृद्संधारण) यांना खर्च करणेचे अधिकार राहतील.

सदर योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, कृषि स्तरावर स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात यावा. सदरचा कक्ष संचालक मृदसंधारण यांचे नियंत्रणाखाली राहील. सदर कक्षासाठी उप सचिव समकक्ष दर्जाचे -१ पद, उपसंचालक समकक्ष दर्जाचे - १ पद, कृषि अधिकारी वर्ग दोन समकक्ष दर्जाचे -१ पद, सहायक लेखाधिकारी समकक्ष दर्जाचे - १ पद व वर्ग – तीन (तांत्रिक - कृषि पर्यवेक्षक/ कृषि सहायक) समकक्ष दर्जाचे - २ पदे, लिपिक - २ पदे, MIS Co Ordinator (कंत्राटी) - २ पदे व डाटा एंट्री ऑपरेटर-२, शिपाई-१ पद अशी एकूण १३ पदाची नेमणूक करण्यात यावी. आवश्यकतेनुसार कृषि विभागातील प्रतिनियुक्तीवर अगर सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा कंत्राटी तत्वावर या कक्षासाठी घेण्याचे अधिकार आयुक्त कृषि यांना देण्यात येत आहेत. तसेच सदर योजना अंमलबजावणीसाठी क्षेत्रिय फिरतीसाठी देय प्रवास भत्ता अदायगी करता येईल. सदर सेवांचे मानधन अदायगीसाठी वित्त विभागाकडील शासन प्रचलित नियमानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय राहील. सदरचा खर्च हा या योजने अंतर्गत राज्यासाठी खर्च होणा-या निधीचे १ टक्का आस्थापना खर्च या अंतर्गत अदायगी करण्यात येईल. जिल्हा/तालुका स्तरावर प्रस्तावित २ टक्के आस्थापना खर्च करणेस मुभा राहिल.

तसेच याच धर्तीवर मंत्रालय स्तरावर स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात यावी. सदर कक्षामध्ये कक्ष अधिकारी १ पद, सहायक १ पद, सहायक लेखाधिकारी १ पद, लिपिक २ पदे, MIS Co Ordinator (कंत्राटी)-२ पदे व डाटा एंट्री ऑपरेटर-२, शिपाई-१ पद अशी एकूण १० पदाची नेमणूक करण्यात यावी. स्वतंत्र कक्षाद्वारे मा. मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.मुख्यसचिव यांचेकडे बैठकांचे आयोजन करणे, V.C. चे नियोजन करणे, विवीध संगणकीय प्रणालीचे समन्वयन करुन कृषि आयुक्तालया कडून येणा-या वेबसाईट बाबतच्या समस्यांचे निराकरण करणे, वित्त, नियोजन, मदत व पुनर्वसन विभागाकडे निधी व धोरणाबाबतच्या नस्त्या सादर करणे, राज्याचा संकलित अहवाल कृषि आयुक्तांकडून प्राप्त करुन घेणे, राज्यस्तरीय प्रचार प्रसिध्दी व इतर अनुषंगिक कामाचा समावेश राहील. यासाठी राज्यस्तरीय आस्थापना विषयक १ टक्के आस्थापना खर्च तरतुदीमधून खर्च करण्यात यावा.

"मागेल त्याला शेततळे" योजना धडक स्वरूपात राबविण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा अधिकारी व तालुका स्तरावर उप विभागीय अधिकारी (महसूल) यांना **"नोडल अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे व विहित मुदतीत करावी. शेततळयांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा अहवाल नियमितरित्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांनी जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने आयुक्त (कृषि),सचिव (रोहयो) यांना सादर करावा.

जिल्हा/ तालुक्यांना दिलेले उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करणे. पुर्ण झालेल्या शेततळयाची तपासणी करून अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर अदा करण्यात यावे.

**१०. तपासणी:-**

शेततळयाच्या कामाची गुणवत्ता कायम राहवी यासाठी विभागाच्या मापदंडानुसार वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. केवळ पूर्ण झालेल्या शेततळयांची तपासणी करण्या बरोबर काम चालू असताना प्राथमिक अवस्थेतील कामांनाही भेटी देऊन तपासणी व मार्गदर्शन करावे.

**११. त्रयस्थ संस्थेमार्फत कामांची भौतिक तपासणी व मूल्यमापन :-**

जिल्हास्तरीय समितीने शेततळयाच्या झालेल्या कामाचे मुल्यमापन यशदा, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (उन्नत महाराष्ट्र अभियान अंतर्गत शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण

विभाग क्रमांक-बैठक-३६११/ (५६/१५)/ तांशि-२ दिनांक १३ जानेवारी,२०१६ या शासन निर्णयाप्रमाणे) शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय कृषि महाविद्यालय, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी या संस्थांमार्फत करण्यात यावे.

सदरचा खर्च कृषी आयुक्त स्तरावरील आस्थापना विषयक १ टक्के तरतुदीमधून करण्यात यावा.

**१२. <u>आस्थापना खर्च:-</u>**

शेततळ्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यास वित्तीय वर्षात जेवढे अनुदान वाटप होईल, त्याच्या २ टक्के रक्कम आस्थापना विषयक बाबीसाठी देय राहील. त्यात जाहिरात, लेखन सामग्री, वेबसाईटवर माहिती भरणे, अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव राहील. जिल्ह्याला लक्षांक मंजुर झाल्यावर अग्रीम स्वरुपात आस्थापना खर्चासाठी रक्कम आयुक्त (कृषि) मार्फत वितरीत करण्यात येईल व ती त्यांनी शेततळ्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे वर्ग करावी. अग्रीम रक्कम अंतिमत: आस्थापना खर्चात समायोजित केली जाईल. झालेल्या खर्चाची माहिती वेबसाईटवर भरण्यात यावी. वित्तीय वर्ष संपल्यावर वर्षभरात झालेला खर्च, याबाबत उपयोगीता प्रमाणपत्र, त्रयस्थ संस्थेचा अहवाल/तपासणी अहवाल इ. सादर करून पुढील वित्तीय वर्षात निधीची मागणी करावी.

**१३. <u>वेबसाईट :-</u>**

लाभार्थी निवडीची प्रक्रिया पारदर्शक असावी म्हणून या योजनेसाठी https://aaplesarkar.maharashtra.gov.in ही वेबसाईट उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या वेबसाईट वर लाभार्थ्यांचे नाव, त्याने केलेल्या अर्जाचा दिनांक, त्याची वैयक्तिक माहिती, समितीने निवडलेल्या लाभार्थीची यादी, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, काम पूर्ण केल्याचा दिनांक, निधी वितरीत केल्याची माहिती, इत्यादी उपलब्ध करुन द्यावी. तालुका कृषि अधिकारी यांनी वेबसाईटवर आज्ञावलीत माहिती भरण्याची कार्यवाही करावी.

१४. "मागेल त्याला शेततळे" कार्यक्रमासाठी लागणारा निधी योजनेतर-"Drought Mitigation Measures" अंतर्गत रोहयो विभागास मदत व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. मदत व पुनर्वसन विभागाच्या - या लेखाशिर्षाद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानंतर सदर

निधी रोजगार हमी विभागाकडून कृषि आयुक्त ,पुणे यांना वितरीत करण्यात येईल. आयुक्त (कृषि) यांना निधी वितरणाबाबत **नियंत्रक अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्त कृषी यांनी सर्व जिल्ह्यांची उपयोगिता प्रमाणपत्रे एकत्र करून शासनास सादर करावीत व पुढील निधीची मागणी करावी.

**१५.** सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.३३-अ/व्यय-८ दिनांक १.२.२०१६ अन्वये तसेच सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**१६.** सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक 201602171543525516 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**( प्रभाकर देशमुख )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क,मुंबई (प्रसिध्दीकरीता),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व उपायुक्त (विकास)
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो व सर्व मंत्रालयीन विभाग,
निवडनस्ती रोहयो-५

## परिशिष्ट अ

### मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत सन २०१६-१७ करीता जिल्हानिहाय शेततळ्यांचा लक्षांक

| अ.क्र. | जिल्हा | शेततळ्यांचा लक्षांक |
|---|---|---|
| १ | ठाणे | ० |
| २ | पालघर | ० |
| ३ | रायगड | ० |
| ४ | रत्नागिरी | ० |
| ५ | सिंधुदूर्ग | ० |
| **कोकण विभाग** | | **०** |
| ६ | नासिक | २५०४ |
| ७ | धुळे | ९५३ |
| ८ | नंदूरबार | ८०० |
| ९ | जळगाव | १६७१ |
| १० | अहमदनगर | २३९२ |
| **नासिक विभाग** | | **८३२०** |
| ११ | पुणे | १२७३ |
| १२ | सोलापूर | १९१६ |
| १३ | सातारा | ७७५ |
| १४ | सांगली | ९१६ |
| १५ | कोल्हापूर | ४०७ |
| **पुणे विभाग** | | **५२८७** |
| १६ | औरंगाबाद | २४१७ |
| १७ | जालना | १७०६ |
| १८ | बीड | २४८० |
| १९ | लातूर | १९२३ |
| २० | उस्मानाबाद | १९६६ |
| २१ | नांदेड | २५३८ |
| २२ | परभणी | १६६२ |
| २३ | हिंगोली | १५०८ |
| **औरंगाबाद विभाग** | | **१६२००** |
| २४ | बुलढाणा | २६११ |
| २५ | अकोला | २११० |
| २६ | वाशिम | १८९२ |
| २७ | अमरावती | ३१५९ |
| २८ | यवतमाळ | ३४४३ |
| **अमरावती विभाग** | | **१३२१५** |
| २९ | वर्धा | २०३४ |
| ३० | नागपूर | १८२९ |
| ३१ | भंडारा | ८५२ |
| ३२ | गोंदीया | ४६० |
| ३३ | चंद्रपूर | १९६३ |
| ३४ | गडचिरोली | १३४० |
| **नागपूर विभाग** | | **८४७८** |
| **एकूण** | | **५१५००** |

## प्रपत्र-१

### "मागेल त्याला शेततळे" योजना घेण्याबाबत

**जाहिरात क्रमांक :-** **दिनांक -**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा | |
| २ | योजनेचे नाव | " मागेल त्याला शेततळे योजना " |
| ३ | पात्रता | १) ज्या शेतकऱ्यांकडे त्यांच्या नांवावर कमीत कमी ०.६० हे. जमीन उपलब्ध आहे.<br>२) यापूर्वी इतर योजनांच्या माध्यमातून शेततळे, सामुदायिक शेततळे अथवा बोडी या घटकांचा लाभ घेतलेला नसावा.<br>३) लाभार्थी शेतकऱ्याची जमिन शेततळयाकरिता तांत्रिकदृष्टया पात्र असणे आवश्यक.<br>४) मागील ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमधील लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. |
| ४ | आवश्यक कागदपत्रे | १) जमिनीचा ७/१२<br>२) ८ अ चा उतारा<br>३) दारिद्ररेषेखालील कार्ड / आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या बारसाचा दाखला. |
| ५ | प्राधान्यक्रम | १)दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) शेतकरी व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेली आहे अशा शेतक-यांना निवड प्रक्रीयेमध्ये जेष्ठता यादीत सुट देऊन प्रथम प्राधान्य<br>२) इतर सर्व प्रवर्गातील शेततळे मागणी करणा-या शेतक-यांना जेष्ठता यादीनुसार (प्रथम अर्ज सादर करणा-यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे) सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. |
| ६ | शेततळ्याचे आकारमान व अनुदान | |

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटरमध्ये) |
|---|---|
| १ | १५ X १५ X ३ |
| २ | २० X १५ X ३ |
| ३ | २० X २० X ३ |
| ४ | २५ X २० X ३ |

| | | |
|---|---|---|
| | | ५ — २५ X २५ X ३<br>६ — ३० X २५ X ३<br>७ — ३० X ३० X ३ |
| ७ | अर्ज प्राप्त करुन घेणे व ऑनलाईन सादर करणे | वेबसाईट - https://aaplesarkar.maharashtra.gov.in<br>संपर्काचे ठिकाण — महा ई सेवाकेंद्र / तालुका कृषि अधिकारी |
| ८ | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ४५ दिवसात |
| ९ | अर्ज ऑनलाईन सादर करण्याची कार्यपध्दती. | इच्छूक शेतकऱ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज तथा संमती या योजनेत भाग घेण्यासाठी अनिवार्य आहे. याबाबत शेतक-यांनी त्यांची मागणी ऑनलाईनद्वारे संगणकीय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. यासाठी करावयाचे अर्ज https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.<br>या वेबसाईटवरून अर्जाचा नमुना (प्रपत्र — २) इच्छुक लाभार्थ्यांनी दिनांक २३/२/२०१६ पासून download करून घ्यावेत. प्रपत्र २ मध्ये नमूद केलेली माहिती जमा करून मूळ अर्ज भरून लाभार्थ्याने स्वत:च्या स्वाक्षरीसह सर्व कागदपत्रे Scan करून ठेवावे. Online पध्दतीद्वारे या - https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्जातील माहिती Online भरुन अर्जात नमूद केलेली जोडपत्रे Scan Copy जोडून Upload करावी. Online अर्जाची पोचपावती इच्छुक लाभार्थ्यांनी download करून स्वत:कडे ठेवावी.<br>Online अर्ज Upload करण्याची प्रक्रिया दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वर नमूद केलेल्या वेबसाईटवर उपलब्ध राहिल.<br>या योजनेत अर्ज करणा-या व्यक्तीने प्रथम आपले सरकार संकेतस्थळावर जाऊन मागेल त्याला शेततळे या लिंक वर क्लिक करावे.त्यानंतर अर्जदारास खालील तीन पर्याय उपलब्ध राहतील |

| | | |
|---|---|---|
| | | अ) आपले सरकार संकेत स्थळावर यापूर्वीच तयार केलेल्या प्रोफाईल चा वापर करणे.<br>ब) आपले सरकार पोर्टल वर नव्याने प्रोफाईल तयार करुन (वरील अ नुसार प्रोफाईल उपलब्ध नसल्यास)<br>क) कोणत्याही महा ई सेवा केंद्रामार्फत (CSC) मध्ये<br>प्रथम उपरोक्त (अ) व (ब) मधील पर्यायांकरीता स्वत:चा मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच (अ) व (ब) बाबत अर्जदार स्वत: अथवा सायबर कॅफेतून संगणकाचा वापर करुन अर्ज भरु शकतो. अर्जासाठी सेवाशुल्क रु.२० अधिक सेवाकर लागू राहील.<br>उपरोक्त (क) बाबत अर्जदाराकडे मोबाईल क्रमांक नसल्यास महा ई सेवा केंद्रातून अर्ज भरत असताना वरील बाबींसाठी (Scanning, Uploading इत्यादी) प्रक्रिया महा ई सेवा केंद्र चालकामार्फत करावा. |

**प्रपत्र-२**

**"मागेल त्याला शेततळे" योजना घेण्याकरिता अर्जाचा नमुना**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी ....................**

**विषय : "मागेल त्याला शेततळे" योजना मिळण्याबाबत.**

**महोदय,**

मी खालील सही करणार विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो / करते की, मला **"मागेल त्याला शेततळे"** योजने अंतर्गत शेततळे घ्यावयाचे आहे. माझी वैयक्तीक व शेती संबंधातील माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | | | | |
| | | (प्रथम नाव) | (वडिलांचे / पतीचे नाव) | (आडनाव) | |
| २ | लिंग | स्त्री | पुरुष | तृतीयपंथी | |
| ३ | जिल्हा | तालुका | | | गाव |
| ४ | दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्र.उपलब्ध असल्यास | | | | |
| ५ | जात / संवर्ग | अ.जा. | अ.ज. | इतर | |
| | | (संवर्ग) | | | (जात) |
| ६ | दारिद्रय रेषेखालील असल्यास,यादीतील अनुक्रमांक | | | | |
| ७ | शेततळे घ्यावयाचा | सर्व्हे / गट क्र. | क्षेत्र | तालुका | गाव |
| ८ | मागणी केलेल्या शेततळ्याचे आकारमान<br>शेततळ्याचे प्रकार- इनलेट आऊटलेटसह /इनलेट आऊटलेट विरहीत | | | | |
| ९ | संबंधित शेतक-याचे ८ अ प्रमाणे एकुण क्षेत्र | हे. | | आर. | |
| १० | स्वत: अथवा कुटूंबातील अन्य सदस्यांनी यापूर्वी शासकीय योजनेतून शेततळे, सामुदायिक शेततळे अथवा बोडी याचा लाभ घेतला आहे काय ? | | | होय | नाही |
| ११ | राष्ट्रीयकृत बँक खाते | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (राष्ट्रीयकृत बँकेचे नाव) (शाखा) (बँकेचा IFSC कोड क्र) (खाते क्र.) | | |
| १२ | आधार कार्ड क्र.(उपलब्ध असल्यास) | | |
| १३ | अर्जा सोबत जोडलेली कागदपत्रे | | |
| | अ)७/१२ उतारा | होय | नाही |
| | ब) ८-अ नमुना | होय | नाही |
| | क)आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या वारसाचा दाखला. (तलाठी) | होय | लागु नाही |
| | ड) दारिद्र रेषेबाबतचा दाखला (ग्रामसेवक) | होय | लागु नाही |
| | इ) सामुदायिक शेततळे साठी करार | होय | लागु नाही |
| | फ) स्वत:च्या स्वक्षरीसह भरलेले अर्ज Scan करुन Upload करावे. | | |

शेततळे योजनेची सर्व माहिती मला मिळाली असून, योजनेचे नियम व अटी मला मान्य आहेत.या योडने अंतर्गत एकच शेततळे अनुज्ञेय आहे, एकापेक्षा जास्त शेततळ्याचा लाभ घेतल्यास त्या शेततळ्याची अनुज्ञेय रक्कम वसुलपात्र राहील. शेततळे योजनेचा लाभ मिळणेस विनंती आहे.

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व बरोबर आहे. वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास निवड होण्यास मी अपात्र राहीन तसेच निवडीनंतर लाभ घेतल्यास प्राप्त अनुदान शासनाच्या नियमानुसार वसूलपात्र राहीन.

आपला विश्वासु,

दिनांक - ( )

अर्ज संकेत स्थळावर नोंदणी करताना पाळावयाच्या महत्वाच्या सुचना

१) अर्ज (प्रपत्र-२) संपूर्णपणे भरल्यानंतर त्यावर स्वाक्षरी करावी व स्कॅन करावे. स्कॅन केलेल्या Fileची Size १५०KB पेक्षा जास्त असू नये.

२) अ. क्र. १७ अ ते १७ फ नुसार आवश्यक असलेली कागदपत्रे वेगवेगळी स्कॅन करावीत. स्कॅन केलेल्या Fileची Size १५०KB पेक्षा जास्त असू नये.

३) ONLINE अर्ज (प्रपत्र-२ नुसार) संकेतस्थळावर माहिती भरून त्यासोबत (अ) उपरोक्त कागदपत्रे (१७ अ ते १७ फ), (ब) स्वाक्षरी केलेले मुळ प्रपत्र-२ upload करावयाची आहेत.

४) अर्ज प्राप्त झाल्यानंतर संगणकीय प्रणालीद्वारे पोच पावती देण्यात येईल.

**प्रपत्र - ३**

## अर्जदाराच्या अर्जाची / मागणी पत्राची छाननी अहवालाचा नमुना

**अर्ज प्राप्त दिनांक** **आवक नोंद / क्रमांक –**

**अ) अर्ज छाननी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | | | |
| | | (प्रथम नाव) | (वडिलांचे / पतीचे नाव) | (आडनाव) |
| २ | गाव | तालुका | जिल्हा | |
| ३ | जात / प्रवर्ग | | | |
| | | जात | प्रवर्ग | |
| ४ | दारिद्रय रेषेखालील असल्यास, यादीतील अनुक्रमांक | | | |
| ५ | एकूण जमिन धारणा (हेक्टर) व वर्गवारी | | | |
| | | हेक्टर | वर्गवारी | |
| ६ | शेततळे घ्यावयाचा शेताचा सर्व्हे / गट क्र. व क्षेत्र | सर्व्हे नंबर | धारण क्षेत्र (हेक्टर) | |
| ७ | मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान (मिटर) | लांबी .........Xरूंदी .....Xखोली...... | | |
| ८ | अर्जा सोबत प्राप्त कागदपत्रे | ७/१२ उतारा | होय / नाही | |
| | | ८-अ नमुना | होय / नाही | |
| | आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या वारसाचा दाखला | | होय / लागू नाही | |
| | दारिद्र रेषेबाबतचा दाखला | | होय / लागू नाही | |
| | सामुदायिक शेततळे संबंधित रु.१००स्टँप पेपरवर करार | | होय / लागू नाही | |
| ९ | मागणी अर्जातील माहितीत विसंगती / तांत्रिक चूक आढळली काय ? | | | |

शेतकऱ्याचा अर्ज व उपलब्ध कागदपत्रानुसार अर्जदार शेतकरी शेततळे योजनेच्या लाभासाठी पात्र / अपात्र आहे.

मंडळ कृषि अधिकारी

तालुका कृषि अधिकारी

## प्रपत्र - ४

जिल्हास्तरीय समितीच्या **"मागेल त्याला शेततळे"** योजनेअंतर्गत अवलोकनार्थ सादर करावयाच्या यादीचा नमुना.

### अ) प्राप्त अर्जाचा तालुका निहाय गोषवारा

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | | अर्जाची वर्गवारी निहाय संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर सर्व प्रवर्ग | एकूण | एकूण पैकी दारिद्र रेषेखालील | एकूण पैकी आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे वारस |
| | | स्त्री | | | | | | |
| | | पुरूष | | | | | | |
| | | तृतीयपंथी | | | | | | |
| | | एकूण | | | | | | |

### ब) पात्र अर्जाचा तालुका निहाय गोषवारा

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | | अर्जाची वर्गवारी निहाय संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर सर्व प्रवर्ग | एकूण | एकूण पैकी दारिद्र रेषेखालील इतर प्रवर्ग | एकूण पैकी आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे वारस |
| | | स्त्री | | | | | | |
| | | पुरूष | | | | | | |
| | | तृतीयपंथी | | | | | | |
| | | एकूण | | | | | | |

**टिप -** उपरोक्त गोषवा-या सोबत अर्जदार लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी (पात्र व अपात्र सह) जोडली आहे.

दिनांक -

( )

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

## क) सर्व अर्जदार लाभार्थ्यांची तालुकानिहाय आवक सूचीनुसार यादी

| अ.क्र. | तालुका | शेतक-यांचे नांव | पत्ता | शेतक-यांची वर्गवारी | | | | | | प्रस्तावित शेततळ्याचा आकार | शेततळे घ्यावयाचा सर्व्हे क्र. | पात्र / अपात्र | अपात्र असल्यास कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर सर्व संवर्ग | एकूण | एकूण पैकी दारीद्र रेषेखालील | एकूण पैकी आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे वारस | | | | |

प्रपत्र ५

**"मागेल त्याला शेततळे"** योजनेकरिता प्राप्त अर्जदारांच्या अर्जाची छाननी व शिफारशीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी दिनांक ------रोजीच्या बैठकीत तालुका निवड समितीने शासन निर्णयातील निकष, मार्गदर्शक सूचना, व दिलेल्या उद्दिष्टांच्या अधिन राहून वरीलप्रमाणे तालुकानिहाय पात्र लाभार्थ्यांपैकी खालीलप्रमाणे लाभार्थी निवडीस मान्यता दिली आहे.

**अ) निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | प्राप्त अर्जापैकी पात्र अर्जांची संख्या | | | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकूणपैकी | | | | |
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर सर्व प्रवर्ग | एकूण | दारीद्र रेषे खालील | आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे वारस |
| | | | स्त्री | | | | | | |
| | | | पूरूष | | | | | | |
| | | | तृतीयपंथी | | | | | | |
| | | | एकूण | | | | | | |

तालुका कृषि अधिकारी ................ उपविभागीय अधिकारी,
जिल्हा...............

**ब) निवडलेल्या पात्र लाभार्थ्यांची यादी**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | प्राप्त अर्जापैकी पात्र अर्जांची संख्या | | | | | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर सर्व प्रवर्ग | एकूण | एकुणपैकी | | क्षेत्र |
| | | | | | | | दारिद्र रेषेखालील | आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे वारस | |

तालुका कृषि अधिकारी ................ उपविभागीय अधिकारी,
जिल्हा...............

## क) प्रतिक्षा यादी

| प्रतिक्षा यादी क्रमांक | तालुका | शेतक-यांचे नांव व पत्ता | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | दारिद्य रेषेखालील | अल्प / अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग | क्षेत्र | योजना |

तालुका कृषि अधिकारी ................ उपविभागीय अधिकारी,.

## (ड) अपात्र अर्जदारांची यादी

| अ.क्र. | तालुका | शेतक-यांचे नांव व पत्ता | निवडलेल्या लाभार्थ्यांची वर्गवारी निहाय संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | दारिद्य रेषेखालील | अल्प / अत्यल्प भूधारक | इतर प्रवर्ग | क्षेत्र | योजना |

तालुका कृषि अधिकारी ................ उपविभागीय अधिकारी,

जिल्हा..............

**प्रपत्र ६**

**निवड झालेल्या लाभार्थ्यास द्यावयाचा कार्यारंभ / मंजुरी आदेश**

जा.क्र./शेततळे/............../२०१६

तालुका कृषि अधिकारी कार्यालय.......

दिनांक ...../..../

प्रति,

श्री.................

मु.पो.....................ता............., जि. ................

**विषय - शेततळे मंजूरी / कार्यारंभ आदेशाबाबत......**

उपरोक्त विषयावरील आपल्या दिनांक ........... च्या मागणीपत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक ................. रोजी झालेल्या तालुका निवड समितीच्या बैठकीत, **"मागेल त्याला शेततळे"** योजने अंतर्गत आपली लाभार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. पुढील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आपणांस ....X....X...... इतक्या आकारमानाचे शेततळे घेण्यास कार्यारंभ आदेश देण्यात येत आहे.

सदर आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण शेततळ्याचे काम सुरू करावे.

| | |
|---|---|
| १) | निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील. |
| २) | निश्चित केलेल्या आकारमानाचेच शेततळे घेणे बंधनकारक राहील |
| ३) | काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील. |
| ४) | काम पूर्ण झाल्यावरच अनुदानाची मागणी करता येईल. |
| ५) | कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही. |
| ६) | मजूर / मशिनच्या मालकास शासनाकडून परस्पर पेमेंट केले जाणार नाही. |
| ७) | शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतींची लागवड करणे बंधनकारक राहील. |
| ८) | शेततळ्याची निगा / दुरूस्तीची जबाबदारी शेतक-यावर राहील. |
| ९) | पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साठणार नाही यासाठी व्यवस्था करावी लागेल. |
| १०) | शेततळ्यातून पिकांना पाणी देण्याची व्यवस्था शेतक-यास स्वखर्चाने करावी लागेल. |
| ११) | कृषि सहाय्यक यांनी साईट सिलेक्शन आखणी करून दिल्यावरच मंजूर अंदाजपत्रका सोबतच्या गट नं. मध्ये काम करावे. आपले मर्जीने कामे सुरू केल्यास शेततळ्याचे अनुदान काढण्याची जबाबदारी घेण्यात येणार नाही. |
| १२) | मंजूर शेततळे ज्या योजनेतून पूर्ण करण्यात आले आहे त्याचा बोर्ड लावणे. |
| १३) | ३० दिवसात काम सूरू न झाल्यास हे आदेश रद्द ठरतील. |

तालुका कृषी अधिकारी ..................

प्रत, माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी ..........................

२) उपविभागीय कृषी अधिकारी..........................

**प्रपत्र ७**

**<u>मंजूर शेततळेचे काम १०० टक्के पुर्ण झाल्यावर लाभार्थी शेतक-याचा १०० टक्के पुर्णत्वाचा</u> अहवाल.**

प्रति,

तालुका कृषी अधिकारी,

..............................................

मी , श्री./श्रीमती ..................... गांव .................... तालुका .................. जिल्हा.................. असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषी अधिकारी ..................... यांच्या आदेश क्र. ............ दिनांक ...................... अन्वये मला मंजूर केलेल्या ...X....X.... या आकारमानाच्या शेततळ्याचे काम दिनांक ............... पर्यंत १०० टक्के पूर्ण केले आहे.

कृपया, शेततळयाच्या कामाचे मोजमाप करून मला अनुज्ञेय ठरणारे अनुदान अदा करण्यात यावे, ही विनंती. तसेच सोबत मी माझे राष्ट्रीयकृत / इतर बँकेचे नाव ------------ शाखा--------------- खाते क्र.----इत्यादी माहिती असलेले बँक खातेपुस्तकाची झेरॉक्स प्रत सोबत देत आहे. या खात्यावर मला देय असलेले अनुदान वर्ग होण्यास विनंती आहे.

**दिनांक -** **अर्जदाराची सही / अंगठा**

प्रपत्र-८

## काम पूर्ण झालेल्या शेततळयाची तपासणी व मोजमाप अहवाल

**योजना:-** **तपासणीचा दिनांक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | | | |
| • | | (प्रथम नाव) | (वडिलांचे / पतीचे नाव) | (आडनाव) |
| २ | गाव | | | |
| ३ | तालुका | | | |
| ४ | जिल्हा | | | |
| ५ | जात / संवर्ग | अ.जा. अ.ज. इतर | | |
| | | संवर्ग | जात | |
| ६ | दारिद्रय रेषेखालील असल्यास यादीतील अनुक्रमांक | | | |
| ७ | मंजूरीचा तपशिल<br>१) तालुकास्तरीय समितीचा मान्यता दिनांक<br>२)सविस्तर अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता दिनांक<br>३)कार्यारंभ आदेश दिनांक | | | |
| ८ | शेततळे घेतलेल्या शेताचा सर्व्हे नंबर / गट क्र. | सर्व्हे नंबर | धारण क्षेत्र | |
| ९. | मंजूर शेततळ्याचे आकारमान (मिटर) | लांबी .........X रूंदी .......Xखोली...... | | |
| १० | तपासणीमध्ये आढळलेले शेततळयाचे आकारमान (मिटर) | लांबी .........Xरूंदी .....Xखोली...... | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १)लांबी<br>२)रुंदी<br>३)खोली<br>४)घनफळ | घनमीटर | | |
| ११ | सविस्तर अंदाज पत्रकानुसार शेततळयामध्ये आढळलेल्या उणिवा | | | |
| १२ | मंजूर आकारमानानुसार अनुदानाची रक्कम | | | |
| १३ | तपासणीनुसार शेततळयास देय होणारी रक्कम | | | |
| १४ | लाभार्थ्याचे बँक खाते | | | |
| | | बँकेचे नांव | शाखा | खाते क्र. |
| १५ | लाभार्थ्यासह शेततळयाचा फोटो | फोटो सोबत जोडावा | | |
| १६ | शेततळयाचे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश व रेखांश | अक्षांश | रेखांश | |

तपासणीमध्ये उपरोक्त प्रमाणे नोंदी आढळल्या असून केलेल्या कामानुसार शेततळयाचे आकारमान ........असे आहे व रु...........अनुदान अदा व्हावे. सोबत मोजमाप पुस्तिकेची प्रत/ झेराक्स प्रत जोडली आहे.

सही /-

(नाव –

कृषी सहायक /कृषि सेवक..........

(कृ.मा..प.)

उपरोक्त प्रमाणे तपासणी माझ्या समक्ष केली असून घेतलेल्या नोंदी व देय अनुदान मला मान्य आहेत.

सही /-

(नाव –                    )

दिनांक : -                                        लाभार्थी ..........................

कृपया शेततळे कामाच्या उपरोक्त तपासणी अहवालनुसार शेतक-यास ................ आकारमानाप्रमाणे रू. ................... अनुदान देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक :-

कृषी पर्यवेक्षक, .......................

मंडळ कृषि अधिकारी,.........................

तालुका कृषी अधिकारी .................................